


दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार २५ डिसेंबर २०२४ | अंक१६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

## संतोष देशमुख हत्याकांडातील तीन आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ

राज्यासह देशात गाजत असलेल्या बीड जिल्ह्यातील मस्साजोग ता. केजचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडातील तीन आरोपींना आज न्यायालयाने सहा जानेवारी पर्यंत पोलीस कोठडीत वाढ करण्यात आहे आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग ता. केज येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करण्यात आलेल्या प्रकरणातील आरोपी जयराम चाटे, महेश केदार आणि प्रतिक घुले या तीन आरोपींची पोलीस कोठडी दि. २३ डिसेंबर रोजी संपत होती. आज दि. २३ डिसेंबर रोजी पोलीस बंदोबस्तात या तीनही आरोपींना केज न्यायालया समोर हजर केले असता न्यायालयाने पुन्हा त्यांच्या पोलीस कोठडीत वाढ करीत ६ जानेवारी २०२५ पर्यंत पोलीस कोठडीत वाढ केली आहे. दरम्यान चौथा आरोपी विष्णू चाटे यांची २७ डिसेंबर पर्यंत पोलीस कोठडी आहे. तसेच याच गुन्ह्यात आणखी तीन आरोपी फरार आहेत



**ज्येष्ठ कादंबरीकार सुप्रिया अय्यर यांचं निधन भावपुर्ण श्रद्धांजली**




दिनांक २० डिसेंबर २०२४ शुक्रवार रोजी दि एज्युकेशन सोसायटी संचलित,बालभवन मराठी प्राथमिक शाळा ( अंबरनाथ) येथे शेकोटी उत्सवाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी आमच्या लाडक्या शालेय सदस्य व संस्थेच्या प्रमुख विश्वस्त आखरे मॅडम उपस्थित होत्या. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ जाधव मॅडम व ज्येष्ठ शिक्षकांनी सरस्वती पूजन व शेकोटी पूजन केले. सौ जयश्री बोरसे मॅडम यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. सौ शुभांगी भगत मॅडम यांनी शेकोटी उत्सवाचे प्रयोजन, महत्व याविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली. सौ अलका चिमटे, सौ मधुरा चव्हाण व सविता मॅडम यांनी मधुर आवाजात भावगीते, भक्तिगीते व बालगीतांचे सादरीकरण केले.

सौ योगिता सोनवणे मॅडम यांनी कृतीयुक्त शेकोटी गीत सादर केले. शेकोटी गीतावर विद्यार्थ्यांनी फेर धरत वातावरणात उल्हास निर्माण केला. त्यानंतर इयत्ता तिसरीच्या शिक्षकांनी उत्तम नियोजन करून सर्व शिक्षकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांचे मनोरंजक खेळ घेतले. या खेळातून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी तीन उत्कृष्ट खेळाडू काढून त्यांना बक्षीस देण्यात आले. त्यानंतर स्वादिष्ट भोजनाचा लाभ सर्वांनी घेतला व कार्यक्रमाची सांगता झाली.

# शेतकऱ्यांसाठी काय निर्णय घेणार? कृषी खातं मिळताच मंत्री माणिकराव कोकाटेंनी सांगितला प्लॅन

## नवे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे लासलगाव दाऱ्यावर आहेत



**बीड ,/प्रतिनिधी** मंत्रिमंडळ विस्तारानंतर महायुतीच्या मंत्र्यांना आता खाते वाटप देखील करण्यात आलं आहे. खातं जाहीर होताच त्या – त्या खात्याचे मंत्री ॲक्शन मोडमध्ये आल्याचं पाहायला मिळत आहे. यावेळी राज्यचं कृषीमंत्रिपद हे महायुतीमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाला देण्यात आलं आहे. माणिकराव कोकाटे हे राज्याचे नवे कृषीमंत्री आहेत. दरम्यान आज माणिकराव कोकाटे हे लासलगाव दौ–ऱ्यावर आहेत, यावेळी बोलताना त्यांनी आपल्या कामाची पुढील दिशा स्पष्ट केली.नेमकं काय म्हणाले कोकाटे? कृषीमंत्री झाल्यानंतर पहिला दौरा आहे, आमचे मित्र कल्याणराव यांच्या घरी आलो आहे. शेतक–ऱ्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी आम्ही मागणी केली होती. माझ्या वाट्याला आता कृषी खाते आले आहे. कृषी खातं हे जबाबदारीचं खातं असून तो काटेरी मुकुट आहे. अवकाळी पाऊस, बाजारभाव असे अनेक प्रश्न निर्माण होत असतात. धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न असेल, शेतीच्या क्षेत्रात कायम जे प्रश्न निर्माण होत असतात त्यावर निर्णय घेतले जातील, असं माणिकराव कोकाटे यांनी म्हटलं आहे.दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, विम्याच्या संदर्भात कोणी गैरफायदा घेतला तर त्याची चौकशी करून कारवाई केली जाईल. शेतक–ऱ्याचा मुलगा आहे, त्यामुळे मला शेतक–ऱ्यांचे प्रश्न माहित आहेत. ओला दुष्काळ पडला असेल तर त्यावर निर्णय येत्या काळात घेऊ. युती सरकार भक्कम आहे. मी कोणाच्या विरोधामुळे लासलगावला आलो नाही तर माझा लासलगावशी जुना संबंध आहे. मी जे बोलतो तेच करतो, मी मंत्रीपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर योग्य ते निर्णय घेईल.दरम्यान एकीकडे यावेळी राष्ट्रवादीकडून माणिकराव कोकाटे यांना कृषीमंत्रिपद देण्यात आलं मात्र दुसरीकडे छगन भुजबळ यांचा पत्ता मंत्रिमंडळातून कट करण्यात आला आहे. मंत्रिपद मिळालं नसल्यामुळे भुजबळ नाराज आहेत, त्यांनी अनेकदा आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवली आहे. तर दुसरीकडे माणिकराव कोकाटे यांच्या स्वागतासाठी जे बॅनर लावण्यात आले होते, त्यावरून देखील भुजबळांचा फोटो गायब होता, भुजबळांऐवजी त्यांचे कट्टर राजकीय शत्रू असलेल्या कांदे यांचा फोटो होता, यावरून देखील चर्चेला चांगलंच उधाण आलं.

# पोलीस अधीक्षकांच्या आदेशानंतर बीड पोलीस ॲक्शन मोडमध्ये

## जिल्ह्यात २८ पोलीस ठाणे अंतर्गत ६३ कारवाया; लाखोंचा मुद्देमाल जप्त




पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी पदभार घेताच बीड पोलीस क्शन मोडमध्ये आली असून जिल्ह्यातील २८ पोलीस ठाणे हद्दीत अवैध धंद्यांवर ६३ कारवाया करून लाखोंचा मुद्देमाल जप्त केला असून अनेकांवर गुन्हे दाखल करण्यात आले. यामुळे अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये खाकीचा धाक निर्माण झाला आहे. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी पदभार घेताच पोलीस दलाची बैठक घेऊन अवैध धंदे बंद करण्याचे आदेश दिले. यात कुचराई करणाऱ्यांनी गय केली जाणार नाही असा सज्जड इशारा दिला होता. याचा परिणाम काल सोमवारी (दि.२३) जिल्ह्यात दिसून आला. जिल्हाभरात काल स्थानिक पोलिसांनी कारवाईची मोहीम हाती घेऊन जुगार अड्ड्यावर छापे मारुन २७ गुन्हे दाखल करुन ३४ जणांवर जुगार खेळणारे आणि खेळविणाऱ्यांवर गुन्हे दाखल करुन या कारवाईत एकूण ८७ हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच अवैध दारु विक्रीच्या अड्ड्यावर ३६ जणांवर ३६ गुन्हे दाखल करुन यावेळी २ लाख ५० हजार ५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. जिल्हाभरात ६३ कारवाया केल्याने अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये खाकीची दहशत निर्माण झाली आहे. या कारवायांमध्ये २८ पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते. या कारवायांमुळे सामान्य जनतेतून समाधान व्यक्त करण्यात येत आह

# मराठा क्रांती मोर्चा नाशिक जिल्हा समन्वयक सौ.सुनिता गांगुर्डे महाराष्ट्र समाज गौरव पुरस्काराने सन्मानित

––नाशिक (प्रतिनिधी–गुरुनाथ तिरपणकर)समाजसेवेची आवड,जमेल त्याला जमेल तशी मदत करणे हा सौ.सुनिता गांगुर्डे यांचा स्वभाव.सौ. सुनिता गांगुर्डे या मराठा क्रांती मोर्चा नाशिक जिल्हा समन्वयक म्हणून कार्यरत आहेत.छत्रपती सेना,सकल मराठा समाज नाशिक याठिकाणी ही त्यांचे कार्य चालु आहे.त्यांच्या या चतुरस्त्र,सर्व समावेशक समाज उपयोगी सामाजिक कार्याची दखल नाशिक येथील ग्राहक रक्षक समिती च्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.सौ.आशाताई पाटील यांनी घेतली.नुकताच सौ.सुनिता गांगुर्डे यांना नाशिक येथील



सौ.सुनिता पुंजराम गांगुर्डे
नाशिक

सॅलिब्रिटा हॉटेल मध्ये प्रतिथयश,आदरणीय सन्मानिय प्रतिभावंतांच्या हस्तेमहाराष्ट्र समाज गौरव पुरस्कार वर्धापनदिन समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.सौ.सुनिता गांगुर्डे या अनाथाश्रम,वृध्दाश्रम,बालकाश्रम येथे जाऊन त्यांना अन्नदान,खाऊ वाटप,कपडे वाटप,जीवनावश्यक वस्तूचे वाटप करत असतात.कोरोना काळातही त्यांनी गरजवंतांना,निराधारांना मदत केलेली.वेगवेगळ्या संस्थांनी सौ. सुनिता गांगुर्डे यांना विविध पुरस्कारांनी गौरवांकीत केले आहे.ग्राहक रक्षक समिती च्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.सौ.आशाताई पाटील यांच्या संकल्पनेतून वर्धापनदिन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल सुनिता गांगुर्डे यांनी ग्राहक रक्षक समिती च्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.सौ.आशाताई पाटील यांचे आभार मानले.समाजसेविका सौ. सुनिता गांगुर्डे यांनामहाराष्ट्र समाज गौरव पुरस्कारमिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

# महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत आणि सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी घेतली मस्साजोग येथील देशमुख कुटुंबियांची सांत्वनपर भेट..!

## महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या वतीने कुटुंबास आर्थिक मदत..





## देशमुख यांच्या हत्येमध्ये ज्यांचा हात असेल तो कोणीही असो, कोणत्याही पक्षाचा असो त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे

केज प्रतिनिधी – केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत निर्घृणपणाने हत्या करण्यात आली. या हत्येमधील एकही आरोपीला आम्ही सोडणार नाही अशी शासनाची भूमिका आहे. याबाबत विश्वास देण्यासाठी व देशमुख कुटुंबीयांना शासन त्यांच्यासोबत खंबीरपणे आहे ही हमी देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा संदेश देण्यासाठी आम्ही इथे आलो आहोत. असे आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले. शिवसेनेच्या वतीने देशमुख कुटूंबीयांना आर्थिक मदतही देण्यात आली. सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटूंबियांची भेट घेतली. उदय सामंत यांनी गावक–यांसोबत देखील चर्चा करून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. या प्रकरणी एस आय टी गठीत करण्यात आलेली असून न्यायालयीन चौकशी देखील करण्यात येत आहे, त्यामुळे या प्रकरणात लवकरात लवकर दोषीना शिक्षा व्हावी तसेच देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळावा यासाठी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आदेश दिले आहेत असेही उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले.

आता नवनिर्वाचित महायुतीच्या मंत्रिमंडळातील सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांशी भेट घेतली. यावेळी त्यांनी लोकांशी बोललो तेव्हा मलाही भीती वाटल्याची कबुली मंत्री शिरसाट यांनी दिली. परंतु या हत्याकांडामध्ये आरोपी अटक केल्यानंतर गुप्तता पाळली जात आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येला राजकारणामध्ये आणू नका. विरोधक आणि सत्ताधारी काय म्हणतात, त्यामध्ये रस नाही. आमची भूमिका स्पष्ट आहे. यात देशमुख यांच्या हत्येमध्ये ज्यांचा हात असेल तो कोणीही असो, कोणत्याही पक्षाचा असो त्याच्यावर कारवाई झाली पाहिजेफ असेही यावेळी मंत्री संजय शिरसाट म्हणाले आहेत.

### महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या वतीने आर्थिक मदत

दरम्यान, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या वतीने संतोष देशमुख यांच्या कुटूंबियांना यावेळी आर्थिक मदत देण्यात आली. आणि पुढील घराची जबाबदारी सुद्धा घेतली. यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत व सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाठ, युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, अविनाश जाधव, सुमित कोळपे, अजय सूरवसे, सुरज चुंगडे यांच्या हस्ते संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी, भाऊ धनंजय यांच्याकडे ही मदत सुपूर्द करण्यात आली.

## संपादकीय

# आता पालकमंत्री!

मंत्रिमंडळ विस्तारानंतर सुरू झालेली खातेवाटपाची प्रतीक्षा आता संपली आहे. अपेक्षेप्रमाणे महत्त्वाची खाती भाजपकडेच आली. गृह खात्यावरील आपला दावा भाजपने कायम राखला. राज्यावर पकड ठेवण्यात कळीची भूमिका बजावणारा हा विभाग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच सांभाळणार आहेत. गृह खाते मिळावे हा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आग्रह होता. त्यासाठी सुरु झालेल्या दबावतंत्राला भाजपने जुमानले नाही. गृह विभागाऐवजी नगरविकास हा विभाग एकनाथ शिंदे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. त्याशिवाय गृहनिर्माण विभाग देऊन त्यांची नाराजी कमी करण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना विधानसभेतील घवघवीत यशाचे बक्षीस म्हणून महसूल विभाग त्यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. कायमचे उपमुख्यमंत्री, असा अजित पवार यांचा अनेकदा उल्लेख होतो. त्यांना कायमचे ङ्गअर्थमंत्रीफ असे म्हणणेही आता चुकीचे ठरणार नाही. अर्थ खात्यासाठीचा आपला हट्ट त्यांनी भाजपच्या श्रेष्ठांकडून पूर्ण करून घेतला. महायुती सरकारमध्ये एकनाथ शिंदे यांची शिवसेना काहीशी अस्वस्थ आणि अजित पवारांची राष्ट्रवादी निर्धास्त असे चित्र दिसते. महायुतीच्या आधीच्या कार्यकाळात उत्पादन शुल्क विभाग शिवसेनेकडे होता. त्या विभागाचे मंत्रिपद आपल्याकडे आणण्यात अजित पवार यांना यश आले. छगन भुजबळ यांचे नाशिक जिल्ह्यातील विरोधक मानले जाणारे माणिकराव कोकाटे नवे कृषी मंत्री आहेत. राष्ट्रवादीच्या कोट्यातील हा विभाग माणिकराव कोकाटे यांना देऊन अजित पवार यांनी भुजबळांना संदेश दिला आहे. भाजपचे राज्यातील ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे हसन मुश्रीफ यांनी आधीच्या कार्यकाळातील आपली खाती कायम राखली आहेत. शिंदे सरकारमध्ये कृषी मंत्री असलेल्या धनंजय मुंडे यांना अन्न व नागरी पुरवठा हे खाते देण्यात आले. जलसंपदा खाते राधाकृष्ण विखे यांना विभागून मिळणे अनपेक्षित मानले जाते. मंत्रिमंडळ विस्तारात त्यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांच्यानंतर शपथ घेतली होती. त्यांचे पक्षातील स्थान आणि ज्येष्ठता अधोरेखित करण्यासाठी ते झाले; मात्र खातेवाटपातून त्यावर शिक्कामोर्तब झाले नाही, हे स्पष्ट दिसते. जलसंपदाचा एक विभाग गिरीश महाजन यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. पूर्वी त्यांनी ग्रामविकास खाते सांभाळले होते. तो विभाग पहिल्यांदाच कॅबिनेट मंत्री झालेल्या जयकुमार गोरे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. महाजन हे फडणवीसांचे विश्वासू मानले जातात. मात्र, वजनदार खात्यापासून ते दूर राहिले. पंकजा मुंडे यांना पर्यावरण खात्याची जबाबदारी मिळाली. पंकजा मुंडे आपली नाराजी किती काळ बाहेर येऊ देत नाहीत, हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. आता सर्वच पक्षांच्या मंत्र्यांना खासगी सचिव नेमताना मुख्यमंत्री कार्यालयाची मंजुरी घ्यावी लागेल. आपल्या संमतीशिवाय कारभार होणार नाही, हे मुख्यमंत्र्यांनी त्याद्वारे सूचित केले असून मित्र पक्षांच्या स्वातंत्र्याच्या आणि अधिकाराच्या मर्यादा देखील स्पष्ट केल्या आहेत. खातेवाटपानंतर आतासचिव नेमतानाही परवानगी घ्यावी लागेल. आपल्या संमतीशिवाय कारभार होणार नाही, हे मुख्यमंत्र्यांनी त्याद्वारे सूचित केले असून मित्र पक्षांच्या स्वातंत्र्याच्या आणि अधिकाराच्या मर्यादा देखील स्पष्ट केल्या आहेत. खातेवाटपानंतर आता सरकारच्या कारभाराला गती यावी, अशी अपेक्षा आहे. बीड जिल्ह्यात सरपंच संतोष देशमुख यांची ज्या अमानुष पद्धतीने हत्या झाली त्याने महाराष्ट्र हादरला. या हत्येनंतर बीड जिल्ह्यात चालणाऱ्या खंडणीखोरीवर प्रकाश पडला आहे. या प्रकरणाचे ज्यांच्याकडे निर्देश होत आहे ते नेते महायुतीत आहेत. महाराष्ट्राचा बिहार होणार नाही, हे पाहण्याची जबाबदारी गृह विभागाची सूत्रे असलेल्या फडणवीस यांची आहे. वारेमाप आश्वासने देत, सवलतींची खैरात करत निवडणुकीचा फड जिंकला; पण त्यातून येणाऱ्या आर्थिक आव्हानांचा सामना करताना सरकारची कसरत होणार आहे. कुपोषण, बनावट औषधे पुरविणाऱ्यांची साखळी असे प्रश्न आरोग्य क्षेत्रासमोर आहेत. सामान्यांना दिलासा मिळेल, अशी पावले सरकारकडूच उचलली जातील, ही अपेक्षा! सरकारच्या कारभाराला गती यावी, अशी अपेक्षा आहे. खातेवाटप झाले म्हणजे सरकारचा गाडा सुरळीत चालेल, असे मानणे भाबडेपणाचे ठरेल. आता स्पर्धा होईल ती पालकमंत्री पदासाठी! ! आपापले बालेकिल्ले सुरक्षित राखण्यासाठी महत्त्वाचे ठरणारे ते पद मिळवण्याकरता रस्सीखेच होणार आहे.

# गावगाडाकर साहेबराव नंदन तात्या एक व्यक्ति अनेक भूमिका

गावगाडाकर साहेबराव नंदन तात्या कधी सोहळे घालून देवपूजेत मग्न असतात. तर कधी आपल्या म नासारखे घडले नाही म्हणून देवाशीच मनातल्या मनात भांडतात. वेळ असल्यास कधी मंदिराचे उंबरठे झिझवतात तर कधी मंदिराच्या पायरीवरंच भक्तांशी संवाद साधतात. कधी गाभा-यातील दगडाच्या मुर्तीवर नतमस्तक होतात. कधी दूरून डोंगर साजरे करतात कधी प्रवचने कधी व्याख्याने देतात. कधी समाज प्रबोधनासाठी लांबवर हजेरी लावतात. कधी वाटलचं तर तमाशाच्या फडात जाऊन फड मालकाशी व कलावंताशी व तमासगिरांशी गप्पा देखील मारतात कधी गावगाड्याच्या बारा भानगडीत न पडता वाडा गाडा संस्कार संस्कृती रूढी प्रथा परंपरावर आधारीत तुकातात्याच्या भूमिकेत वावरतात. कधी काव्य गीते लिहितात त्यांचा धोतराचा सोगा व बायजा काकूचा खांडव्यातला फाटका पदर लेखात मांडायला कधीच विसरत नाहीत. खूप काही वाटलंच तर बालपनीची गोदाकाठची अस्तुरीचा घायाळ व भाऊक प्रियकर होऊन मनसोक्त आठवणीत रडतात. कधी
कधी ते साठीत देखील आपल्या छैल छबिलीच्या आठवणीत रममाण होऊन गतस्मृती जागवत असतात. नाटकात कधी नायक कधी खलनायक कधी सुदामा कधी कृष्ण कधी पाटील कधी सरपंच एकना अनेक भूमिका ते जगत आले आहेत. त्यांच्या लेखणावर
साहित्यावर भाळून अनेक संस्थानी त्यांच्यावर अनेक पुरस्कारांचा व सन्मान पत्रांचा नुसता वर्षाव केला आहे. भाड्याचा घरात पडदीवर एक वेळेस धान्याचे डाळी साळीचे डबे रिकामे खाली असतील, परंतू स्मृतीचिन्हे गौरव पत्रे ठेवायला जागा अपूरी पडते. सगर रत्न विशेषांक काय ? गावगाडा काव्यसंग्रह काय ? सगर सेवार्थी व्यक्ति विशेष काय ? सगर दिपोत्सव दिवाळी अंक काय ? आता तर नवी कोरी करकरीत भावना प्रधान परिसस्पर्श नावाची कादंबरीचा प्रपंच मांडून थाटात प्रकाशन करून देखील झाले. त्याच कादंबरीला ५ जानेवारीला २०२५ ला मल्टीपर्पज फाऊंडेशन मलकापूर जि. बुलडाणा



यांचा निळूभाऊ फुले साहित्य गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. हे विशेष मागे मुंबईत जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.हळव्या मनाचा दुबळा कवी लेखक संपादक फाटक्या झोळीतून साहित्यातून प्रबोधनातून श्रीमंतीचे दाणं वाटत फिरत आहे. ताहाराबाद सारख्या ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील साहेबराव तात्या नंदन यांचे उच्चशिक्षण नसेल ही परंतू त्यांच्या निरीक्षणाने आणि आकलनाने साहित्यिक दृष्टी त्यांनी प्राप्त केली आहे.कमी शिक्षित असूनही चांगले प्रवचनकार, उत्कृष्ठ वक्ता, कवी साहित्यिक संपादक अश्या विविध क्षेत्रांवर यशस्वी आघाडी घेतली आहे नाशिकपंचवटीक्षेत्री जाऊन आपला कामधंदा सांभाळून कला व्यासंग छंद जोपासत आहेत मागील तीन चार वर्षापासून पूर्णपणे साहित्यिक क्षेत्राला वाहून घेतले आहे.सदाबहार असलेले,हसतमुख व्यक्तिमत्व साहित्यिक क्षेत्रामध्ये प्रचंड गुण गौरवाने नावलौकिकास पात्र ठरले आहेत. अहिराणी

शब्दरचना ही त्यांची खास खासियत आहे.त्यांनी अहिरानी मध्ये जे शब्द अनाकलनीय आहेत ते सुद्धा आकलनिय करून देण्याचे काम केले आहे.त्या शब्दांमध्ये इतका मोठा अर्थ असतो. अश्या काही भावना असतात.त्या त्यांनी गावगाडा ह्या काव्य संग्रहामध्ये प्रसिद्ध केलेल्या आहेत.गावगाडा ह्या काव्यसंग्रहातील प्रत्येक कविता ग्रामीण भागातील जीवन दर्शन घडवते.जुन्या झालेल्या संस्कृती पुन्हा उजळवून काढते.नवीन गोष्टींना चालना देण्यासाठी जुन्या संस्कृती आवश्यक असतात. हेच जोपासण्याचे काम ह्या ग्रेट तात्यांनी अत्यंत उत्कृष्ठरित्या सादरीकरण करून लोकांच्या हृदयामध्ये स्थान निर्माण केले आहे.
यामुळेच का होईना संबंध महाराष्ट्रात आता त्यांचा नावलौकिक वाढलाआहे संबध महाराष्ट्र त्यांना साहेबराव तात्या म्हणून ओळखायला लागला आहे. शेकडोंनी सन्मानपत्रे अनेक पुरस्कार,वेगवेगळ्या पद्धतींनी मान सन्मान त्यांना प्राप्त होत आहेत. अनेक ठिकाणी प्रमुख वक्ता म्हणून, पाहुणे म्हणून कार्यक्रमांना बोलावले जात आहे.एका सामान्य माणसांच्या दुणियेतला फाटक्या झोळीचा म ाणूस कवी मनाने मात्र श्रीमंत आहे. साहित्यानेअतिशय उच्चकोटीचे आहेत. अशा साहित्यिकांशी माझा सहवास लाभला हे माझे भाग्य ! त्यांच्या साहित्याचा मळा अनेक ठिकाणी फ ुलला.त्यामध्ये मलाही सेवेकरी होण्याची संधी मिळाली आहे.मी पुनश्च साहेबराव तात्यांचे मनापासून अभिनंदन करते.नुकताच त्यांना प्रजासत्ताक अमृत गौरव पुरस्कार समिती,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचा बहू मानांकित प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय जिवन गौरव प्रजासत्ताक अमृत गौरव पुरस्कार २०२४ङ्ग* प्रदान करण्यात आला आहे. त्याच धर्तीवर नुकताच वसुनंदीनी फाऊंडेशन जळगाव यांचा देखील राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार प्राप्त झाला आहे. तात्यांच्या साहित्य संपदेचे कौतुक खूप खूप शुभेच्छा

**लेखिका**
**कु.रुपाली कन्हैयालाल चौधरी**
Bcom,MA(English)LLB
**पिंपळनेर(धुळे)**

# नाताळ : आनंदाचा व हर्षोल्हासाचा सण

ख्रिसमस किवा नाताळ हा ख्रिश्चन धर्मियांचा महत्व-पूर्ण सण आहे. ख्रिसमसचा शब्दश: अर्थ आहे क्रा-इस्टस मास अर्थात येशुच्या जन्मानिमित्त करण्यात येणारी सामूहिक प्रार्थना. दरवर्षी २५ डिसेंबर रोजी नाताळाचा सण साजरा करण्यात येतो. ख्रिश्नन लोकं या सणाला फार महत्व देतात कारण जीझस ईश्वराचे पुत्र असल्याची त्यांची श्रद्धा आहे. ना-ताळ हा आनंद व हर्षोल्साचा सणं आहे. या दिवशी गिरिजाघरात प्रार्थना, कॅरॉल्सचे गायन करण्यात येते. शुभ कामना कार्डसची घेवाण देवाण होते. ख्रिश्चन बांधव नाताळच्या आगमना अगोदर पासूनच प्रार्थना व कॅरॉल्सच्या गायनास सुरूवात करतात. संपूर्ण जगभरातल्या गिरीजाघरां मध्ये येशुची जन्मगाथा झाक्यांच्या रूपात प्रदर्शित केल्या जाते. चोवीस डिसेंबरच्या रात्री पासूनच आरती व पुजा पाठास सुरूवात होते. दूसरया दिवशी सकाळीच जन्म दिनाचा सोहळा असतो. ख्रिश्चन बांधव एक दूसरयांची गळाभेट घेवून शुभेच्छांचे आदान प्रदान करतात. गिरिजाघरात मंगल कामनेचे प्रतिक म्हणून ख्रिसमच-ट्रीची सजावट केली जाते. आज ना-ताळला धार्मिकते सोबतच सामाजिक महत्वही प्राप्त झाले आहे. इंग्रजी भाषीक देशामधील लोकं या दिवशी एक विशेष प्रकारची पुडिंग व केक इत्यादी बनवतात. भारताच्या नागरी भागात हा सण पश्चिमी देशां सारखच साजरा करतात. या दिवशी सांता क्लॉज मुलांना मिठाई व भेट वस्तू देतो. परंतू देशातील आदिवासी आणि खेड्या पाड्यांच्या लोकांच खानपान या दिवशी वेगळ असते. तांद-ुळाच्या रव्या पासून बनविलेली केक व केळी हे यांच्या जेवणाचा एक महत्वपूर्ण भाग असतते. आर्थिकरित्या संपन्न नसणारया घरात हे व्यंजन भेट म्हणून पाठविण्यात येते. दक्षिण भारतात काही भागात पायस वाटण्यात येतो. परंपरावादी ख्रिश्चन लोकांसाठी हा सण प्रार्थना आणि आत्मशुद्धीचे कारण असते, म्हणून रोमन कॅथोलिक्स संप्रदायाचे लोक एक डिसेंबर पासून पंचवीस डिसेंबरपर्यंत फक्त शाकाहारी भोजनाचे सेवन करतात. ख्रिसमस ट्रीची परंपरा ख्रिसमस ट्रीची परंपराख्रिसमस ट्रीची परंपरा * ख्रिसमस हा येशू ख्रिस्ताचा जन्मोत्सव आहे. पण तो साजरा करण्याची सुरवात ख्रिस्तानंतर ४०० वर्षांनी झाली. रोमचा पोप ज्युलियसने पहिल्यांदा २५ डिसेंबरला ख्रिस्ताचा जन्मदिवस म्हणून मान्य केले व तीच ख्रिसमसची तारीख ठरली. * सा-तव्या शतकात एका भिक्षूने पहिल्यांदा त्रिकोणी फर वृक्षाचा उपयोग (सुचीपर्णी) सजवण्यासाठी केला. त्रिकोणानी त्याने ईश्वराच्या ङ्गपिता-पुत्रआत्माफ ह्या विद्यांना जोडले तेंव्हापासून त्रिकोणी ख्रिसमस ट्री चे महत्त्व निर्माण झाले. * सोळाव्या शतकांत मार्टिन ल्युथर किंग यांनी पहिल्यांदा त्या ट्रिला मेणबत्त्यांनी सजवले. मुलांना आकाशातील चमकते तारे या झाडावर उतरल्याचे दाखविण्यासाठी त्याने असे केले. पुढे मेणबत्त्या लावण्याची प्रथाच झाली. * जर्मनीचा राजकुमार अलबर्टने १८४१ मध्ये इंग्लंडची राणी व्हिक्टोरियाशी लग्न केले आणि आपल्याबरोबर ख्रिसमस ट्री ची परंपरा इंग्लंडला आणली. * चौथ्या शतकांत तुर्कस्थानमध्ये एक ख्रिश्चन पादरी होते. त्यांचे नाव निकोलस. त्यांच्या चांगल्या कामाने व मुलांविषयीच्या विशेष जिह्वाळ्याने त्यांना संत ही उपाधी मिळाली. त्यानंतर ते फादर निकोलस संत निकोलस आणि पुढे सांताक्लॉज नावाने ओळख-ले जाऊ लागले. असा साजरा करतात ख्रिसमस असा साजरा करतात ख्रिसमसअसा साजरा करतात ख्रिसमस पाश्चिमात्य देशात ख्रिश्चन लोक मोठ्या प्रम ाणात आहेत तेथे हा एक मोठा सण आपल्याकडच्या दिवाळीसारखा साजरा केला जातो. * हा सण १२ दिवस साजरा करतात. * ह्या दरम्यान बागेत, चर्चमध्ये एकत्र येऊन, मेणबत्त्या लावून ख्रिसमस गीत (कॅरोल) म्हटले जाते. * २४-२५ डिसेंबरची रात्र ही या सणातील महत्त्वाची असते. कारण त्या-वेळी येशू ख्रिस्ताचा जन्म होतो. या दिवशी चर्चम ध्ये विशेष प्रार्थनासभा आयोजित केल्या जातात. * मुलांसाठी २४ डिसेंबरची अर्धी रात्र महत्वा-ची असते. जेव्हा सांताक्लॉज घराच्या चिमणीच्या (धुराडे) आत घुसून झोपलेल्या मुलांच्या टांगलेल्या मोज्यांत खेळणी टाकतो. * घरातल्या प्रत्येकासाठी ख्रिसमस ट्री वर काहीतरी गिफ्ट टांगलेले असते. २५ डिसेंबरला उठल्यावर पहिल्यांदा लोक त्या भेटवस्तू बघतात. * घरातल्या पाळीव प्राण्यांनाही त्यांच्या आवडीच्या भेटवस्तू असतात. * प्रत्येक रात्री मेजवानी असते. त्यात मुख्य अतिथी म्हणून घरची मोठी माणसे असतात. मित्र आणि आप्तेष्ठ या मेजवानीत सामील होऊन मौजमजा करतात

# २४ डिसेंबर महान गायक मोहम्मद रफी यांना १०० वी जयंती निमित्त विनम्र अभिवादन.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम.मंगळवार दिनांक 24 डिसेंबर 2024 रोजी महान गायक मोहम्मद रफी यांना 100 व्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन, भारत भर मोहम्मद रफी चे चाहते ठिक ठिकाणी जयंती साजरी करुन विनम्र अभिवादन करतात,मो.रफींना मरणोत्तर भारतरत्न द्यावा ही अनेक चाहत्यांनी भारत सरकार कडे मागणी केली आहे.गायक मो.रफींचा जन्म 24 डिसेंबर 1924 मध्ये अमृतसर जिल्ह्यातील कोटला सुल्तान सिंह नावाच्या गावात झाला, अगदी लहान पणापासून त्यांना गुणगुणायची सवय होती.हा त्यांचा छंद पाहून त्यांच्या मोठ्या भावाने हमीद भाईंनी त्यांना मनापासून प्रोत्साहन दिले.मो.रफींना संगीताची तालीम बडे गुलाम अली खाँ साहेब, उस्ताद अब्दुल वाहिद साहेब, मार्फत देण्यास सुरुवात केली. एकदा लाहोर येथे प्रसिद्ध गायक कुंदनलाल सैगल यांच्या गायनाचा कार्यक्रम होता.त्यावेळी हमीद भाईंनी मो.रफींना गायक कुंदनलाल सैगल यांच्या समोर गायला लावले, कुंदनलाल सैगल यांनी मो.रफींना आशिर्वाद देते सांगितले," एक दिवस तू मोठा गायक होणार यात शंका नाही." मो.रफींनी पहिले गाणे लाहोर मध्ये गायले, त्या गाण्याचे संगीत कार शामसुंदर होते, पंजाबी फिल्म चे नाव गुलबलोच होते,पुढे सन 1948 मध्ये महात्मा गांधी यांची हत्या झाली त्यावेळी गीतकार राजेंद्र कृष्ण यांनी रातभर जागून "बापू की अमर कहानी" लिहिले,हे गाणे मो.रफींनी गाऊन चित्रपट सृष्टीला आपली वेगळी ओळख करून दाखविली. त्यानंतर हमीद भाईंनी मो.रफींना संगीतकार नौशादजी बरोबर भेट घडवून आणली.त्यावेळी नौशादजी नी मो.रफींना मिनर्व्हा मुव्ही टोन मध्ये जाऊन मीर साहेबांना भेटायला सांगितले.त्यावेळी मो.रफीं कडे बसने जाण्यासाठी पैसे ही नव्हते.त्या वेळी दिल्लगी चे निर्माण चालू होते.



मो.रफींनी संगीतकार नौशादजीच्या संगीत दिग्दर्शनाखाली गाणी गायली." तेरे कुचेमें अरमानों की दुनिया लेके आया हुं" आणि" इस दुनिया में दिलवालों,दिल का लगाना खेल नहीं" या दोन गाण्याला प्रचंड प्रसिद्धी मिळाली.त्या नंतर बैजू वावरा चित्रपटांमधील गाण्यांनी भारत भर धमाका उडविला, प्रत्येकाच्या तोंडी बैजू वावरा ची गाणी रेंगाळत होती, प्रत्येक प्रियकर आपल्या प्रियेसीला प्रेम पत्रातून लिहू लागला,गुणगुणू लागला." तू गंगा की मौज मैं जमुना का धारा,हो रहेगा मिलन ये हमारा तुम्हारा ' " खिलौना" मधील संजीव कुमार वर चित्रीत केलेले " खिलौना जानकर तुम तो मेरा दिल तोड जाते हो "हे गाणे मो.रफींनी गायले,हे गाणे म्हणजे संपूर्ण खिलौना चित्रपटाचा आत्मा च वाटतो,पगला कही का मधील शम्मी कपूर वर चित्रीत केलेले " हां,तुम मुझे युं भुलाना पाओगे " हे गीत मो.रफींनी आपल्या वेगळ्या शैलीत गायले, एक फूल दो माली चित्रपटांमधील वेगवेगळ्या मूड मधील गाणी मो.रफींनी गायली.ती आजही प्रेक्षकांना भुरळ पाडतात.जंगली मधील " एहसान तेरा होगा मुझपर" सुरज मधील " बहारों फूल बरसाओ" जीने की राह मधील " आनेसे उसके आये बहार" राम और शाम मधील " आज की रात मेरे दिल की सलामी ले ले " संगम मधील " ये मेरा प्रेम पत्र पढ़कर" राजा और रंक मधील " फिरकी वाली तू कल फिर ना" " आज मौसम बडा बेईमान है" " तुमने किसीकी जान को जाते हुए देखा " " नफरत की दुनिया को छोडकर" " ओ मेरी मेहबूबा" "तेरी गलीयोंमें ना रखेगे कदम"," एहसान तेरा होगा मुझपर","आपके पहलू में आकर रो दिले"," तेरी प्यारी प्यारी सुरत को"," ये रेशमी जुल्फे ","तुम जो मिल गये हो ","ये दुनिया ये महफिल "," बाबुल की दुवाए लेती जा"," मैं कही कवी ना बन जाऊ," "आजा तुझको पुकारे मेरे गीत रे", " दिल जो न कह सका "अशी वेगवेगळ्या मुड मधील गाणी मो.रफींनी गाऊन अजरामर केली आहेत.मो.रफींच्या गाण्याचे वैशिष्ट्य म्हणजे ज्या कलाकारांसाठी गाणे गाऊन त्या कलाकारांच्या आवाजात आपला आवाज तंतोतंत बसवित. उदा.दिलीप कुमार,जानी वाकर,राजेंद कुमार, शम्मी कपूर वैगरे वैगरे. मो.रफीं हे मितभाषी होते,त्यांचे कोणाशी ही वैर नव्हते.फक्त थोडा काळ रायल्टीच्या मुद्यावर लता मंगेशकर यांचे बरोबर वाद झाला होता.या महान गायकाचे निधन 31 जुलै 1980 मध्ये झाले.
" हां...तुम मुझे युं भुलाना पाओगे..."

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २५ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# ॲड.संभाजीराव पगारे यांना शिक्षण रत्न तर आर. जे. पाटील विद्याभूषण पुरस्काराने सन्मानित

नाशिक वृत्तसेवा साहेबराव नंदन तात्या गेल्या अनेक वर्षापासून ज्ञानसिंधु प्रकाशन संस्था नाशिक. राज्यातील विविध क्षेत्रातील पारंगत गुणीजंनान मधून निवडक राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, व साहित्यिकांच्या मागवलेल्या प्रस्तावातून, निवडक व्यक्तिचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून राज्यस्तरीय ज्ञानसिंधु पुरस्कार देऊन सन्मानित करते. ह्या ही वर्षी ख्यातनाम साहित्यिक प्रि. डॉ. यशवंतराव पाटील यांच्या अध्यक्षते खाली व बालसाहित्यिक रंगकर्मी सौ. माधूरीताई माटे, गिरणा गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश पवार यांच्या उपस्थितीत शनिवार दि. २१ डिसेंबर रोजी राणी लक्ष्मीबाई भवन नाशिक येथे ज्ञानसिंधू प्रकाशन संस्थेने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय भव्य पुरस्कार प्रदान सोहळा व एक दिवसीय कवी संमेलन घेण्यात आले होते. सदरचा सोहळा उत्साहात शब्द सुमणात रंगले होत.




यात राज्यातून विविध आठ पुरस्कार्थींना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यात प्रामुख्याने धुळे जिल्ह्यातील, साक्री तालुक्यातील पिंपळनेर येथील महात्मा फुले शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी ॲड बापूसो. संभाजीराव यशवंतराव पगारे यांना राज्यस्तरीय शिक्षण रत्न पुरस्कार तर घोडदे येथील पिंपळनेर निवासी से. नि. मुख्याध्यापक दादासो श्री आर. जे. पाटील यांना साहित्य सोहळ्यात सोहळ्याचे अध्यक्ष मा. प्रि. यशवंतराव पाटील यांच्या शुभ हस्ते विद्याभूषण पुरस्कार देऊन सन्मानित आले. या प्रसंगी व्यासपिठावर बालसाहित्यिक रंगकर्मी मा. माधुरीताई माटे, गिरणा गौरवचे अध्यक्ष मा. सुरेश पवार उपस्थित होते. प्रथमता: सर्वमान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व प्रतिमापुजन करण्यात आले. ज्ञानसिंधुच्या वतीने चिफ प्रमोटर मा. तान्हाजी खोडे यांनी प्रास्ताविकातून सोहळ्याची महती विषद केली. संयोजक तात्यासो. साहेबराव नंदन व सुभाष उमरकर व तान्हाजी खोडे यांनी पाहुण्यांचे स्वागत करून उपस्थितांना परिचय करून दिला. पुरस्कार्थी ॲड. बापूसो. संभाजी पगारे, दादासो. आर. जे. पाटील व भाऊसो. सुनिल चौधरी यांचा परिचय प्रा.डी. टी. पाटील सरांनी करून दिला तर उर्वरीत पुरस्कार्थींचा परिचय तान्हाजी खोडे यांनी केला. पुरस्कार्थींच्या वतीने ॲड. बापूसो. संभाजीराव पगारे यांनी मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी राज्यभरातून अनेक कवी साहित्यिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती प्रेक्षणिय होती. विशेष करून आर. के. पाटील, निंबाजी भाऊसाहेब, पी. एस. पाटील, सुधाकर साळवे सर, अशोक पाटील, ललितभाऊ साळवे, शंकर पगारे, अनेक राजकीय सामाजिक क्षेतातील मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार प्रदान सोहळ्यात सर्वच पुरस्कार्थींचे कुटूंब कबिला आवर्जून उपस्थित होता.










रांगोळीकार ,शिक्षक श्री विश्वनाथ पांचाळ,व सुलेखनकार, शिक्षक व सुप्रसिद्ध गायक , शिक्षक संतोष साखरे यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार. वर्ल्ड युनिटी कमिशन यू.एस. ए. यांच्या वतीने आज अचीवर कॉलेज कल्याण या ठिकाणी क्रांतीज्योती महात्मा फुले राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार गांधी बाल मंदिर हायस्कूल मधील रांगोळीकार,एन सी सी ऑफिसर,शिक्षक श्री विश्वनाथ पांचाळ ,सुलेखनकार,शिक्षक रत्नकांत विचारे व सुप्रसिद्ध गायक ,शिक्षक संतोष साखरे यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते आज सन्मान करण्यात आला. शाळेतील शिक्षक, पर्यवेक्षक व मुख्याध्यापक अनिल पांचाळ सर यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे.

## ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात दिल्ली येथे कवी देवदत्त बोरसे यांची गझल निवड..



नाशिक वृत्तसेवा साहेबराव नंदन तात्या दिल्ली येथे होणा-या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात कवी कट्ट्यावर, नामपूरचे ता. बागलाणचे कवी, देवदत्त बोरसे यांना गझल सादर करण्यासाठी दिल्ली येथे निमंत्रित करण्यात आले आहे.त्यांच्या अनलज्वाला वृत्तातील मैना या गझलेची सादरीकरणासाठी निवड झाली आहे. कवी देवदत्त बोरसे हे रयत शिक्षण संस्थेच्या क.भा.पा.विद्यालय पिंगळवाडे ता.बागलाण जि.नाशिक या विद्यालयात माध्य.शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.खांदेश साहित्य संघाचे ते नाशिक जिल्हाध्यक्ष आहेत.कवी देवदत्त बोरसे हे अहिराणी व मराठी भाषेचे गझलकार, लेखक व व्याख्याते म्हणून सुप्रसिद्ध आहेत.अनेक विद्यालये महाविद्यालयांमध्ये त्यांनी व्याख्याने दिली आहेत.विविध प्रतिष्ठाने व मंडळांमध्ये त्यांची शिवव्याख्याने गाजलेली आहेत.फदेववाणीफ व ङ्गआठवांचा सागर मझी मायङ्गही त्यांची पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रातील त्यांना ६० पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. खान्देश हितसंग्राम या सामाजिक संघटनेचेही ते नाशिक जिल्हाध्यक्ष आहेत.विविध वर्तमानपत्रे,मासिके व साप्ताहिकांतून त्यांच्या २०० हून अधिक कविता,गझला व लेख प्रकाशित झालेले आहेत.९८ व्या साहित्य संमेलनात दिल्ली येथे त्यांच्या गझलेची निवड झाल्यामुळे सर्वत्र त्यांच्यावर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# समाजसेवक अरविंद सुर्वे समाजभुषण पुरस्काराने सन्मानित





-डोंबिवली(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)-काही व्यक्ती समाजासाठी सत्कार्य करण्यासाठी सर्व समावेशक,सकारात्मक समाजसेवा करण्यासाठी प्रेरीत असतात आणि अशी कामे ते निरंतर करत असतात.असेच हे डोंबिवली येथील समाजसेवी व्यक्तीमत्व म्हणजे अरविंद सुर्वे.अरविंद सुर्वे यांनी त्यांच्या मुळ गावी मौजे.कोंडमाळा,ता.चिपळुण येथील शिर्के वाडीतील दयनीय अवस्थेतील स्मशानभूमी सुशोभिकरणाचे काम हाती घेतलेले आहे.येथील आदर्श शिक्षकांचा सत्कार,जेष्ठ नागरीकांचा सत्कार,म्युझिक मंत्रा इंटरटेनमेंट संस्थेला त्यांचे विशेष योगदान असते,असे अनेक उपक्रम अरविंद सुर्वे हे राबवित असतात. त्यांच्या या समाज उपयोगी कार्याची दखल प्रेरणा फाऊंडेशन महाराष्ट्र सामाजिक संस्था व प्रेरणा रंगमंच नाट्य मंडळाच्या संस्थापिका-अध्यक्षा सौ.प्रेरणा वैभव कुलकर्णी व सचिव वैभव कुलकर्णी यांनी घेतली.नुकताच अरविंद सुर्वे यांना बल्लाळेश्वर मंगल कार्यालय,बदलापूर(पश्चिम)येथे प्रतिथयश आदरणीय मान्यवरांच्या हस्तेङ्गसमाजभुषण पुरस्कारानेङ्गसमारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.प्रेरणा फाऊंडेशन गेल्या सहासात वर्षात रस्त्यावरील गोर गरीब,भटकंती करणा-या लोकांना,अनाथांना जेवण,आर्थिक मदत,रोजगार अशी मदत केलेली आहे.आदिवासी पाडे येथील मुलभुत गरजा,रेल्वे,एस.टी.डेपो परिसर स्वच्छता अभियान,अनाथाश्रम,वृध्दाश्रम यांना सौ.प्रेरणा वैभव कुलकर्णी यांनी मदत केली आहे.या प्रेरणा फाऊंडेशन व प्रेरणा रंगमंच नाट्य मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यास महाराष्ट्रातील प्रतिभावंत व्यक्ती हजर होत्या.प्रेरणा फाऊंडेशनच्या वतीनेङ्गसमाजभुषण पुरस्कारङ्गदिल्या बद्दल अरविंद सुर्वे यांनी अध्यक्षा प्रेरणा वैभव कुलकर्णी व सचिव वैभव कुलकर्णी यांचे आभार मानले आहेत.अरविंद सुर्वे यांनाङ्गसमाजभुषण पुरस्कारङ्गमिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

## भारत सरकारने महान गायक मोहम्मद रफी यांना मरणोत्तर भारतरत्न द्यावा... पत्रकार भारत कवितके यांची मागणी.



भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम.24 डिसेंबर 2024 रोजी महान गायक मोहम्मद रफींची 100 वी जयंती निमित्त भारत सरकारने मोहम्मद रफींना भारत रत्न जाहीर करावा.अशी मागणी मुंबई कांदिवली पश्चिम येथील जेष्ठ पत्रकार साहित्यिक गीतकार सामाजिक कार्यकर्ता भारत कवितके यांनी केली आहे.यापूर्वीही भारत कवितके यांनी भारत सरकारकडे निवेदन पाठविले आहे." गरीबों की सुनो,वो तुम्हारी सुनेगा,तुम एक पैसा दोगे,वो दस लाख देगा," असे कधी भिकाऱ्यांच्या आर्त,दीन,स्वरात,तर कधी," जानेवालों, जरा होशियार, यहाँ के हम है राजकुमार" असे बेहोश, बेधुंद राजकुमार होऊन गाणारा,तर कधी प्रियेसीला छेडणारा प्रियकराचा आवाज, हृदयातून साद घालून काळीज पिळवटून टाकणारी गजल गाणारा गायक मोहम्मद रफी,तर कधी भक्ती रसाने ओथंबून गाणारा भक्त,कधी रंगतदार पणे कव्वाली गाणारा कव्वाल,अशा विविध भाव भावनांच्या छटांचे सप्तसुरांतून मो.रफींनी पिसारे फुलविले.मराठीतील " ळ" या अक्षरांची अनेक अमराठी गायकांनी धास्ती घेतली होती, अनेक अमराठी गायक "ळ" बद्दल तक्रार करीत असत,पण हेच "ळ" मोहम्मद रफींनी आपल्या गाण्यातून सहजपणे उच्चारले आहे, मराठीतील संगीतकार श्रीकांत ठाकरे ( राज ठाकरे यांचे वडील) यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली मोहम्मद रफींनी अनेक मराठी गाणी गायली आहेत." प्रकाशातले तारे तुम्ही अंधारावर रुसा,हसा मुलांनो हसा" हे बालगीत," अंग पोरी संभाल दर्या ला तुफान आयलय भारी," हे कोळी गीत," हे मना आज कोणी बघ तुला साद घाली," हे भावगीत," नांदतो देव हा आपुल्या अंतरी "हे भजन,अशी अनेक मराठी गाणी मोहम्मद रफींनी गाऊन अजरामर केली आहेत.अशा महान गायकास मरणोत्तर भारतरत्न द्यावा ही मागणी पत्रकार भारत कवितके यांची आहे.जानेवालों, जरा होशियार, यहाँ के हम है राजकुमार" असे बेहोश, बेधुंद राजकुमार होऊन गाणारा,तर कधी प्रियेसीला छेडणारा प्रियकराचा आवाज, हृदयातून साद घालून काळीज पिळवटून टाकणारी गजल गाणारा गायक मोहम्मद रफी,तर कधी भक्ती रसाने ओथंबून गाणारा भक्त,कधी रंगतदार पणे कव्वाली गाणारा कव्वाल,अशा विविध भाव भावनांच्या छटांचे सप्तसुरांतून मो.रफींनी पिसारे फुलविले.मराठीतील " ळ" या अक्षरांची अनेक अमराठी गायकांनी धास्ती घेतली होती, अनेक अमराठी गायक "ळ" बद्दल तक्रार करीत असत,पण हेच "ळ" मोहम्मद रफींनी आपल्या गाण्यातून सहजपणे उच्चारले आहे, मराठीतील संगीतकार श्रीकांत ठाकरे ( राज ठाकरे यांचे वडील) यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली मोहम्मद रफींनी अनेक मराठी गाणी गायली आहेत." प्रकाशातले तारे तुम्ही अंधारावर रुसा,हसा मुलांनो हसा" हे बालगीत," अंग पोरी संभाल दर्या ला तुफान आयलय भारी," हे कोळी गीत," हे मना आज कोणी बघ तुला साद घाली," हे भावगीत," नांदतो देव हा आपुल्या अंतरी "हे भजन,अशी अनेक मराठी गाणी मोहम्मद रफींनी गाऊन अजरामर केली आहेत.अशा महान गायकास मरणोत्तर भारतरत्न द्यावा ही मागणी पत्रकार भारत कवितके यांची आहे.



बीड : येथील जालना रोड संत इग्नाती लोयोला चर्च येथे ख्रिसमस नाताळ निमत्त विद्युत रोषणाई करण्यात आली. (छाया-कृष्णा शिंदे)

# आत्मोन्नतीसाठी तसेच मानसिक स्थैर्यासाठी सूक्त पठण लाभकारी - ह.भ.प. प्रज्ञाताई पंडित

*ठाणे:* अंतरंग ज्येष्ठ नागरिक सामाजिक संस्थेच्या वतीने दिनांक २२ डिसेंबर रोजी कालिका सभागृह, कोलबाड येथे ह.भ.प. प्रज्ञा पंडित यांच्या देवी सूक्त निरूपणाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेच्या संस्थापिका प्रा. सौ. अनुराधा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. सचिव डॉ. अशोक पाटील आणि श्रीमती रेखा दीक्षित यांच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमाला संस्थेच्या कार्यकारिणी सदस्य श्री. मुकुंद पेडणेकर, शोभा कोंजलवार आणि इतर सभासदांचेही मोठे योगदान लाभले. ह.भ.प. प्रज्ञा पंडित यांनी देवी सूक्ताच्या गूढ आणि आध्यात्मिक अर्थाचे सहज, सोप्या भाषेत निरूपण केले. त्यांनी आत्मोन्नती, मानसिक स्थैर्य आणि अध्यात्मिक उन्नतीसाठी सूक्त पठणाचे महत्त्व उलगडून सांगितले. कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आणि देवी सूक्ताच्या महत्त्वाविषयी नवचैतन्य प्राप्त केले. हा कार्यक्रम ज्येष्ठ नागरिकांसाठी आध्यात्मिक प्रबोधनाचे उत्कृष्ट माध्यम ठरला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी संस्थेच्या पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आणि या कार्यक्रमाचे कौतुक केले.



# अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेच्या वतीने मा. नामदार.श्री.एकनाथजी शिंदे साहेब यांना निवेदन सादर.

-------नागपूर(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)माहे मार्च२०२४मध्ये माननीय उपमुख्यमंत्री आदरणीय श्री.एकनाथजी शिंदे साहेब हे राज्याच्या मुख्यमंत्री पदी असताना विणकर समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ जाहीर केले होते.त्या अनुषंगाने त्यांचे ऋण व्यक्त करण्यासाठी नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरु असताना विधानभवनामध्ये त्यांची शिष्टमंडळासह भेट घेण्यात येऊन त्यांचा अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेच्या वतीने शाल,श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.सोबतच,विणकर आर्थिक विकास महामंडळ त्वरीत कार्यान्वित करण्याबाबत,आवश्यक असलेला अधिकारी आणि कर्मचारी वर्ग,विणकर मंडळास निधी उपलब्ध करून देणे,अध्यक्षासह अशासकीय सदस्यांची मंडळावर नेमणूक करणे इत्यादी मागण्या मंजूर होण्याबाबत लेखी निवेदनाच्या माध्यमातून विनंती करण्यात आली.एसबीसी संवर्गाच्या विविध समस्या बाबत सुध्दा आपण जातीने लक्ष केंद्रित करुन न्याय द्यावा अशी सुध्दा विनंती यावेळी शिष्टमंडळाच्या वतीने आदरणीय उपमुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे साहेबांना करण्यात आली.परभणी येथील माजी खासदार आदरणीय श्री.सुरेश दादा जाधव यांच्या नेतृत्वाखाली आणि अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेच्या वतीने प्रदेशाध्यक्ष श्री.सतीश दाभाडे यांनी श्री.एकनाथ शिंदे साहेबांचा सन्मान केला.यावेळी परभणी येथील अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेचे राज्य खजिनदार श्री.विष्णू भाऊ कुटे,विदर्भ संघटक श्री.नरेंद्रजी माहुरे,विदर्भ उपाध्यक्ष श्री.विलास गोरख सांगली जिल्ह्याचे सरचिटणीस श्री.विष्णुपंत रोकडे,नागपूर जिल्ह्याचे अध्यक्ष श्री.रवी भाऊ जुमले इत्यादी उपस्थित होते.भेटीच्या प्रसंगी आदरणीय श्री.एकनाथजी शिंदे साहेब यांनी समाजाच्या सर्व समस्यांचे लवकरच निदान करण्यात येईल अशी खात्री यानिमित्ताने शिष्टमंडळास दिली.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २५ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## साहित्यरत्न पुरस्काराने कवी मनोहर पवार सन्मानित



केळवद येथिल लेखक कवी शाहीर मनोहर पवार यांना १३ व्या मराठी ग्रामिण साहित्य संमेलनात रुई ता. इचलकरंजी जि कोल्हापूर येथे साहित्य रत्न पुरस्कार देवून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले .कवी सरकार स्वाभिमानी वाचन मंदीर इंगळी ता . हात कनंगले जि. कोल्हापूर यांच्या वतीने हनुमान मंदीर सभागृह रुई जि. कोल्हापूर येथे १३ वे ग्रामिण साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते . त्यामध्ये विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले . त्यामध्ये कवी मनोहर पवार केळवद जि बुलढाणा यांना उपस्थित राज्य पाठ्यपुस्तक बालभारती पुणे राज्यपाल नियुक्त सदस्य डॉ. देविदास तारु साहित्यिक कवी लेखक पुरस्कार प्राप्त यांचे हस्ते तसेच जेष्ठ साहित्यिक किसन कुराडे आयोजक कवी सरकार इंगळी रामनाथ डेंगळे पत्रकार तसेच महादेव कुशापा कवियत्री डॉ. मंजुराजे जाधव म, अशोक मोहिते, कवी मधुकर हुजरे, विनायक पाटील, सोन कुसळे नागपूर मनिषा तराळे आदी मान्यवर कवी हजर होते . कवी मनोहर पवार यांना स्वाभिमानी साहित्य प्रेरणा, शाहीर अण्णाभाऊ साठे काव्य रत्न, तसेच शाहीरी कला गौरव, जीवन गौरव, उत्कृष्ठ समाजसेवक, जिल्हा भूषण कला गौरव, असे अनेक विविध प्रकारचे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत वाचन लेखन आणि साहित्य कला सेवा वारसा जपणारे मनोहर पवार हे ग्रामिण भागातून नेतृत्व करीत आहेत . चित्रपट अभिनय लेखन, आणि पर्यटन तसेच शेती बरोबरोर साहित्य सेवा सातत्याने ते करीत असून विविध संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष, सदस्य आहेत . त्यांच्या कार्याचे मित्रपरिवार कडून शुभेच्छा आणि अभिनंदनांचा वर्षाव होत आहे .

# त्या आकाला जेलमध्ये जावेच लागेल!

## बीड जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था शिल्लकच राहिली नाही : आमदार सुरेश धस यांचा घणाघात



**बीड,/प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था राहिलेली नाही. ती अस्तित्वातच आहे की नाही हा प्रश्न पडला आहे. बीड जिल्ह्यात गँग ऑफ वासेपूर सुरू आहे असा गंभीर आरोप सुरेश धस यांनी केला. मी पोलीस ठाण्यात सर्वात कमी फोन करणारा नेता आहे. पोलीस, सीआयडी आरोपींच्या पाठीमागे आहेत. आरोपी लवकरच अटक होतील अशी अपेक्षा आहे. आरोपी विष्णू चाटे

### माजी पालकमंत्री पूर्वी खूप चांगले होते

माजी पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे नाव न घेता सुरेश धस म्हणाले की, माजी पालकमंत्र्यांकडे एकही मित्र राहिला नाही. विद्यमान खासदार बजरंग सोनावणे त्यांचे जिवलग मित्र होते. माजी पालकमंत्री पूर्वी फार चांगले होते. मात्र पाच वर्षात ते वेगळे वागत आहेत. असे का वागत आहेत हे माहीत नाही असे सुरेश धस म्हणाले. बीडचे पालकमंत्री म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदभार स्वीकारावा. अजित पवार जरी झाले तरी माझी हरकत नाही असं सुरेश धस म्हणाले. हे दोघे पालकमंत्री होतील असे मला वाटत नाही. मागच्या पालकमंत्र्यांनी त्यांचे पालकमंत्री पद भाड्याने दिले होते असा टोमणाही त्यांनी मारला.

### पालकमंत्री यांनी मागे हे पालकत्व भाड्याने दिल्याचे चित्र दिसून आले

हा आकाच्या खालचा छोटा आका आहे. पोलिसांनी पकडलं असं वाटत नाही, ते स्वत: सरेंडर झाला आहे. यातला आका लवकरात लवकर आत गेला पाहिजे. हा आता १०० टक्के खंडणीचा गुन्हा राहिलेला नाही. ३०२ चे मुख्य सूत्रधार यामागे आहेत असा आरोप करीत आकाला जेलमध्ये जावेच लागेल असे सुरेश धस यांनी म्हटले आहे. आज मंगळवारी २४ डिसेंबर रोजी सकाळी माध्यमांची संवाद साधताना, आष्टीचे आमदार सुरेश धस यांनी संतोष देशमुख यांच्या खुनासह जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित केला. यावेळी त्यांनी नव्याने आरोप करीत, संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी आता सर्वत्र आंदोलन सुरू झाले असल्याचे म्हटले. आमदार सुरेश धस म्हणाले की, संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपींना १५ दिवसांचा पीसीआर मिळाला ही समाधानाची बाब आहे. सीआयडी अधिकाऱ्यांना तपास करण्याची संधी मिळेल. काल रात्री सीएम साहेबांची सही झाली. आयजी दर्जाचे अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली या दुर्देवी, घाणेरड्या घटनेचा तपास करणार आहेत. याची न्यायालयीन चौकशी होईल असं बीड जिल्ह्याचे आमदार सुरेश धस म्हणाले. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी मनावर घेतलय. प्रचंड रोष एकट्या बीड जिल्ह्यात नाही,

# झोपेत असलेल्या ऊसतोड मजुराचा डोक्यात दगड घालून खून




## मुकदमानेच काढला मजुराचा काटा

परळी तालुक्यातील अस्वलंबा येथील ऊसतोड मजूर विकास बाळासाहेब जोगदंड (वय २८, रा.अस्वलंबा, ता.परळी, जि.बीड) यास त्यांच्याच गावचा मुकादम श्रीकृष्ण विठ्ठल ढाकणे (वय ४७, रा.अस्वलंबा, ता.परळी, जि.बीड) याने झोपेत असताना डोक्यात दगड घालून खून केल्याची घटना घडली आहे. घटप्रभा पोलिस व घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार मुकादम ढाकणे हा आजारी असल्याने त्यास विकास जोगदंड याने उपचारासाठी दवाखान्यात आणले होते. दवाखान्यात दाखल करून जोगदंड दवाखान्या बाहेर उभारण्यात आलेल्या जगद्गुरू गुरु सिद्धेश्वर मूर्ती जवळ रात्री साडेअकराच्या सुमारास झोपला होता. श्रीकृष्ण ढाकणे हा दवाखान्या बाहेर आला आणि काही कळायच्या आत विकास जोगदंड च्या डोक्यात चाळीस किलो पेक्षा मोठा दगडघातला. व छातीवर बसून दगडणे तोंड डोके ठेचू लागला हे पाहून दवाखान्याच्या सुरक्षा रक्षकाने ताबोड तोब ढाकणे याला पकडले. घटप्रभा पोलिसांना माहिती दिली.

## राज्यस्तरीय काव्यभूषण पुरस्कार २०२५ श्री दिनेश खैरे याना जाहीर



राज्यातील साहित्य क्षेत्रातील बहुआयामी बहुनामांकित , सर्वत्र चर्चिला जाणारा तेजस बहुउद्देशीय सामाजिक संस्था नाशिक यांच्यावतीने सर्व क्षेत्रातील निवडक राजकीय , सामाजिक , शैक्षणिक, क्रीडा कला ,सांस्कृतिक ,धार्मिक अध्यात्मिक ,आरोग्य तसेच कवी, लेखक ,संपादक ,शिक्षक, ग्रामसेवक अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांमधून बोटावर मोजता येतील असे बहुविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात. २०२५ चा सामाजिक साहित्य क्षेत्रातील राज्यस्तरीय काव्यभूषण पुरस्कार पुणे येथील नामांकित शिक्षण संस्था नौरोसजी वाडिया महाविद्यालयातील कार्यरत असणारे कर्मचारी नवोदित कवी लेखक श्री दिनेश ताराचंद खैरे यांना नुकताच जाहीर करण्यात आल्याचे निवड पत्र संस्थेच्या अध्यक्षा मा. मेघा डोळस मॅडम यांच्या सहीचे प्राप्त झाले. श्री दिनेश खैरे हे मितभाषी, मृद स्वभावाचे, सेवा कार्यतत्पर, कवी लोकसाहित्य म्हणून सुपरिचित आहेत. सांस्कृतिक, अध्यात्मिक अशा सर्व क्षेत्रात त्यांचा वावर आहे. त्यांची दोन पुस्तके सुद्धा प्रकाशित आहेत. यापूर्वी त्यांना अनेक राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांचे अनेक मानसन्मान सोहळे झाले आहेत. सदरचा पुरस्कार दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी डॉ. मौलाना आझाद संशोधन केंद्र टी. व्ही .सेंटर रोड संभाजीनगर ( औरंगाबाद )येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत काव्य संमेलनात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. त्यांना जाहीर करण्यात आलेल्या पुरस्काराचे सर्वत्र कौतुक होत असून साहित्य क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



## केवायसीच्या नावाखाली डिसेंबरचे धान्य हडप करण्याची तयारी..!

ई–केवायसी आडून रेशन दुकानदारांनी डिसेंबर महिन्यांचा आलेला माल अद्याप वाटप केला नाही. यामुळे गोरगरीब शिधापत्रिका धारक धान्यापासून वंचित आहेत. हा माल वाटप न करताच जानेवारीचा माल वाटप करुन डिसेंबर महिन्याचा माल काळ्या बाजारात जाऊ नये यामुळे पुरवठा अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन डिसेंबर महिन्याचा माल वाटप करण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी शिधापत्रिका धारकांमधून करण्यात येत आहे. बीड शहरासह जिल्ह्यातील काही रेशन दुकानदार नेहमीच माल वाटप न करता तो काळ्या बाजारात विकून स्वतःचे उखळ पांढरे करून घेण्यासाठी संधीच्या शोधात असतात. याचा अनुभव अनेकादा लोकांना आलेला आहे. सध्या शिधापत्रिका धारकांची ई–केवायसी करण्याचे प्रशासनाचे आदेश आहेत. त्यासाठी अवधी कमी राहिला असल्याने सर्व रेशन दुकानदार ई–केवायसीच्या कामात मग्न आहेत.

# साधेपणानं लग्न ही काळाची गरज!

मुलीचा जन्म झाला की, तिच्या पित्याला काळजी असते ती तिच्या लग्नाची!अगदी बाळात्यात असल्यापासून तिला चांगला जोडीदार मिळाला पाहिजे,तिचा संसार सुखाचा झाला पाहिजे . तिच्या शिक्षणाचा , उज्वल भविष्यासाचा विचार त्याच्या डोक्यात अजिबात येत नाही.आणि तेव्हापासूनच तो पोट मारुन पैपै पदराला बांधून ठेवतो.

हळूहळू मुलगी मोठी होऊन लग्नाच्या उंबरठ्यात येऊन ठेपते,मग चालू होते वर संशोधन.! मुलीचा जोडा शोधता शोधता त्याच्या पायीचा जोडा पारं झिजून जातो.मनासारखं स्थळ मिळेपर्यंत सुखाची झोप घेत नाही.मुलगी जर रंगानं काळी, सुस्वरूप नसेल तर तिला अनेक नकार पचवावे लागतात. लग्न जमवणे आणि बाजारात बैल घेणे सारखंच असते.बैल कामाला चांगला नसला तरी चालेल पण दिसायला रुबाबदार आणि देखणा असावा लागतो. एकवेळ मारका असला तरी चालेल पण दिसायला चांगलाच हवा!त्याचे दात,शिंगं,खुर हे सारं काही बघून बैल खरेदी केला जातो.दलालाशिवाय बैल विकल्या आणि घेतल्या जाऊ शकत नाही.आजकाल लग्नासाठी मुलगी मिळणं फार अवघड होऊन बसलंय म्हणून अशा दलालांचा सुळसुळाट झालाय.काहींचा तर हा धंदा होऊन बसलाय.मुलीला कोणी पसंत करत नाही म्हणून मुलीचे वडील वैतागलेले असतात.ते अशा दलालांना बळी पडतात.कधीकधी मुलगा विधुर, घटस्फोटीत असतो.मुलांचा पिताही असतो.दोनदोन बायकाही असतात.गुन्हेगारी प्रवृत्तीचाही असतो. कधीकधी तर लग्नाच्या नावाखाली मुली विकण्याचा त्याचा धंदाही असतो.ब–याचदा वधू पित्याची फसवणूक होते.त्याच्यापासून या गोष्टी लपवल्या जातात.नोकरी, संपत्तीची खोटी माहिती देऊन लग्न जमवले जातात.कायद्यानं हुंडा बंदी असली तरी ही प्रथा काही बंद झालेली नाही.नोकरी करणा–या नवरदेवाचे भाव तर गगनाला भिडलेले आहेत.मुलगी कितीही सुंदर,सुशिल,शिकलेली, आणि पदाधिकारी असली तरी काही महाभाग लग्नाआधी तुम्ही तिची कमाई खाल्ली असेल म्हणून हुंडा घेतात तर मुलाच्या शिक्षणाला खूप खर्च आला म्हणून मुलांचे आईवडील हुंडा मागतात.नवरदेव जर शेतकरी असेल तर त्याचे भाव एकरावर आणि जिरायती, बागायती यांवरुन ठरतात.एकटा असेल तर जरा महाग असतो.ब–याचदा मजोड्याला जोडाफनसला तरी केवळ संपत्ती पाहून लग्न जुळवले जातात.उपवर, घटस्फोटीत,विधुर मुलाला अल्पवयीन मुलगी दिली जाते.नंतर अशी लग्न टिकतातंच असे नाही.एकदा का लग्न जमलं की दहा पाहुणे मुलाचं घर बघायला जातात.नंतर मुलाकडचे वीस पाहुणे मुलीच घर बघायला येतात.मग एवढ्या लोकांचा जेवणाचा खर्च...त्यानंतर होतो साखरपुडा! आणि सोबत महिला असतील तर त्यांच्या साड्यांचा खर्च तो वेगळाच!मुलीचे वडील मुलीच्या लग्नासाठी पैपै जोडून ठेवतात.हुंड्यासाठी कर्ज काढतात आणि उदरनिर्वाहासाठी असलेलं एकर,दोन एकर विकून भूमिहीन होतात.एवढं करून लेकीच लग्नानंतर चांगलंच होईल याची शाश्वती नसते.साखरपुड्याच्या दिवशी शिदोरी देण्याची पद्धत असते.पूर्वी फक्त पाच दुरड्या भरून शिदोरी देत असत.आता शंभर मोठमोठाले डबे भरून शिदोरी दिली जाते जिला कोणी खात नाही.बरं फक्त शिदोरी वरच भागत नाही तर जेवढ्या विहीणी असतील तेवढ्यांना भेटवस्तू ही द्यावीचं लागते.तिखट, चटण्या,तुपाच्या बरण्या, मेकअप च सामान,काजू,बदाम.बापरे!बाप!ही काय प्रथा आहे.अहो! गरिबांना कीती त्रास होतो याचा!लग्न पद्धतीत कमी होण्याऐवजी एक एक रिवाज वाढतंच चाललाय.आजकाल लग्नात पद्धती या कमी होण्यापेक्षा वाढतंच चालल्यात ज्याचा फटका गरिबांना बसतो. एका लग्नाचा खर्च फेडण्यासाठी वधू पित्याला कितीतरी वर्ष कष्ट सोसावे लागतात.कर्ज फेडता फेडता त्याच्या नाकी नऊ येतात.साखरपुडा किंवा सोयरिक पक्की झाली की,नव–या मुलीला भ्रमणध्वनी नव–या मुलांकडून दिला जातो.ब–याचदा यामुळं लग्न मोडतात.बर मुलीच्या अंगावर लग्नात जे दागिने घातले जातात ते दिलेल्या हुंड्यातून.नंतर दिवस येतो तो बस्ता बांधण्याचा! यांचे दहा माणसं त्यांचे दहा माणसं बसतात एका मोठ्या दुकानात! मुलीकडे बस्ता असल्यास नव–यामुलाकडचे, लग्न एकदाच होते म्हणून महागडे कपडे घेतो.बरं किंमती नुसार कपड्यांचा दर्जा नसतो.फक्त दुकानदाराचा फायदा. नव–यामुलीच्याही साड्या फार महाग! लग्नानंतर फक्त कपाटातंच पडून असतात.दोन्हीकडचे लोकं फक्त मयाला गाड त्याला गाडफहेच धोरण राबवत असतात. लग्न म्हटलं की, स्त्रीया कमालीच्या उत्साही असतात. त्यांच्यामागे कामं आणि जबाबदा–याही तेवढ्याच असतात.डोळ्यासमोर फक्त एकच उद्दिष्ट असते ते म्हणजे लेकीच्या लग्नात काही कमी पडू नये आणि ते निर्विघ्नपणे पार पडलं पाहिजे.ग्रामीण भागातील लग्न म्हटलं की, प्रामुख्याने जपावी लागते ती भाऊबंदकी! स्त्री म्हटलं की, मानपान रुसवा–फुगवा हा आलाच!भावकीतील मोठ्या स्त्रीच्या खांद्यावर दळण,हळद ,रुखवत बनवणे यांसारख्या तत्सम कामांसाठी समाजातील स्त्रियांना बोलावण्याची जबाबदारी टाकलेली असते.ग्रामिण भागात अजूनही दळण निवडणे,हळदीचे घाणे घालणे, लग्नासाठी पापड, कुरडया, शिदोरी,रुखवत बनवणे ही कामं समाजातील स्त्रियां मोठ्या आनंदाने करतात.ही कामं करताना सर्व रुढी, परंपरेच तंतोतंत पालन केले जाते.विधवा स्त्रियांना तर हळदीच्या जाण्याला देखील हात लावू दिला जात नाही मग ती वधूची आई असली तरी.आणि आपल्या वाट्याला वैधव्यामुळे ज्या वेदना आल्या,जे भोग भोगले ते लेकीच्या वाट्याला येवून नये म्हणून विधवा स्त्रियांही लांबच राहतात इच्छा असूनसुद्धा!विधुरांना मात्र हे नियम लागू नाहीत.

सगळ्यात महत्त्वाचा दिवस असतो तो हळदीचा.या एक दोन वर्षांत हळदीच्या दिवशी पिवळ्या रंगाचे कपडे परिधान करण्याची प्रथा रूढ झाली आहे.रुढी, परंपरा कशा रुढ होतात त्या या अशा !आजकाल डिजेशिवाय तर हळद अपूर्णच! स्त्री–पुरुष दोघेही नाचून आनंद लुटत असतात.बरेच पुरुष मद्यधुंद असतात.नाचगाण्यात डिजेच्या तालावर ते एवढे तल्लीन झालेले असतात की त्यांना डिजेचा आवाज आणि वेळेचं ही भान नसते.त्याचा त्रास लहान मुलं,आजारी माणसं, विद्यार्थी यांना होत असेल यांचाही विचार करत नाहीत.डिजेच्या आवाजानं शेजारच्या घरातील भांडे पडतात.खिडक्यांच्या काचा फुटतात.भिंतीना तडे जातात.याचं कोणतंच भान त्यांना नसते आणि ते ऐकण्याच्या मनःस्थितीतीतही नसतात.ग्रामिण भागातील लोक समजून घेतात.तक्रार करत नाहीत.लग्नात वाद नको म्हणून....

नंतर उजाडतो तो लग्नाचा दिवस.या दिवसांपासून दोघांच्या नवीन आयुष्याला सुरुवात होणार असते. अत्यंत धावपळीचा आणि गोंधळाचा दिवस.लग्नपत्रिकेत लग्नाची वेळ दोनची असते आणि व–हाड तिनला येतं.आल्यानंतर बराच वेळ पारंपरिक पद्धती पार पाडण्यात जातो.मग निघते ती वरात.नवरदेव शेवंती साठी जातो.त्याची शेवंती आटोपेपर्यंत इकडे पंगती बसतात.सुरवातीला पाहुणे जेऊ घालण्याची पद्धत आहे.पंगत म्हटलं की, आग्रह हा आलाच!नवरीचा बाप किती कष्टानं लोकं जेवू घालण्यासाठी अन्नधान्य जमवत असतो.स्वत: अर्धपोटी राहून लेकीच्या लग्नासाठी पैसे साठवत असतो याची कल्पना कदाचित वाढणाराला आणि खाणाराला नसते.किती अन्न पात्रावर उरलेलं असतं जे उकिरड्यावर टाकलं जातं.त्याला ढोरं आणि कुत्रे देखील कंटाळतात.किती नासाडी होते अन्नाची.अन्न पायंदळीही तुडवल्या जाते.त्यासाठी किती कष्ट उपसले ले असतात!लग्नात जेवणासाठी ज्या पत्रावळ्या,द्रोण, प्लास्टिकचे ग्लास वापरले जातात ते नंतर रस्त्यावर टाकले जातात.त्याची योग्य ती विल्हेवाट लावली जात नाही.त्यामुळे रोगाचा प्रादुर्भाव वाढतो आणि प्रदुषणही. लग्न म्हटलं की आंदण आणि आहेर हा आलाच!आहेर आणि आंदण म्हणून जे कपडे आणि भांडी दिली जातात ती खरंच काही उपयोगाची असतात? लग्नातलं आंदण हे घरी आल्यावर पोत्यात भरून ठेवलं जातं.कधी वापरतील ते एवढे भांडे.घरात ठेवायला जागा देखील नसते.काही दिवसांत ती भांडी न वापरताचं चिरतात ज्याला भंगार वाला देखील घेत नाही.जर तुम्हाला लग्नात भेटवस्तू द्यायचीच असेल तर समजा दोनशे ची भेटवस्तू असेल तर त्याऐवजी पन्नास रुपयांचाच आहेर करा जेणेकरून त्याचा उपयोग होईल.आंदण भांडे म्हणजे मधनी टाकेना आणि चोर नेईनाफ लग्न म्हटलं की,वरात आलीच आणि वरात म्हटली की बँडबाजा, नाचगाणी ही ओघाने आलीच! त्यामागे एक उद्देश असतो तो म्हणजे नवरदेव मिरवूण आणे पर्यंत जेवणाचा कार्यक्रम आरामशीर आटोपते. आजकाल लग्न दारु आणि डिजेशिवाय पारंच पडत नाहीत.नवरदेवाकडील मंडळी मद्यधुंद अवस्थेत नाचत असते.भटजींना भरमसाठ दक्षिणा देऊन जो मुहूर्त काढला जातो,तो ही टळून गेलेला असतो.ब–याचदा गाणं वाजवण्यावरुन वाद उद्भवतात आणि मग व–हाडीच एकमेकांना वाजवतात.बरीच मंडळी लग्न कधी लागते याची वाट पाहून पाहून वधूवरांच्या डोईवर अक्षता न टाकताच निघून जातात.अनेक ठिकाणी उन्हात नाचल्यामुळे नवरदेव मृत्यू मुखी पडल्याच्या घटना घडतात.लग्न जेव्हा व–हाडी मंडळी नाचून थकेल तेव्हा फार उशीरानं लागते.तोच त्यांचा मुहूर्त!नाचण्यापुढे त्यांना बिघडलेल्या वातावरणाचंही भान राहातं नाही. हल्ली तर गणपती, लग्न,देवी, मिरवणूका या दारु पिऊन नाचल्याशिवाय साज–याच होत नाहीत. काही दिवसांनी लोक मढ्याच्या मागेदेखील नाचत नाचत स्मशानात जातील की काय अशी भिती आता वाटायला लागलीय.जसजशी प्रगती होत जाते.पैसा वाढत जातो तसतसे चोचले , हौसमौज, पद्धती वाढत जातात.सध्या वाढती महागाई, दुष्काळ ,नापिकी लक्षात घेता निदान शेतक–यांनी तरी साध्या पद्धतीने कमी खर्चात लग्न करणे ही काळाची गरज आहे.कोरोनाकाळात घरात आणि अगदी मोजक्याच लोकांत लग्न पारं पडलीतंच ना!हे कुठं तरी थांबलं पाहिजे.यात तरुणांनीच पुढाकार घेतला पाहिजे या सगळ्या आधुनिक चालीरीतींना फाटा देत,लग्न हे साध्या पद्धतीने,वेळेत आणि कमी खर्चात केली पाहिजत आणि ती काळाची गरज आहे.शेतकरी आत्महत्या करतो त्याच हे देखील एक कारण असू शकते.

**विद्या सरपाते**

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com